**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**सामान्य प्रशासन विभाग**

**क्र. साप्रवि/ ३८८ /मप दि.०७.०९.२०२६**

## - सूचना परिपत्रक -

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सामान्य प्रशासन विभागामार्फत "मुख्य लिपिक (अर्हताधारक)" संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने खात्यांतर्गत परीक्षा घेऊन भरण्यासाठी विहित अर्हता धारण करीत असलेल्या पात्र व इच्छुक कार्यकारी सहायक (पूर्वीचे पदनाम - लिपिक) व तत्सम संवर्गातील कर्मचा-यांकडून दि. १६.०९.२०२६ ते ०६.१०.२०२६ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्याबाबत परिपत्रक क्र. साप्रवि/३७६/मप दि.०३.०९.२०२६ अन्वये प्रसारित करण्यात आले आहे.

सदर परिपत्रकानुसार ऑनलाईन अर्ज सादर करताना कर्मचा-यास खात्यामार्फत पडताळणी केलेला अर्ज अपलोड करणे बंधनकारक आहे. नगर अभियंता, करनिर्धारण व संकलन, कार्यकारी आरोग्य अधिकारी, सर्वसाधारण विभाग, प्रमुख लेखापाल(वित्त), प्रमुख लेखापाल(पा.पु.म.नि) या युनिटच्या अखत्यारितील उप कार्यालयांनी मुख्य लिपिक (अर्हताधारक) परीक्षेस बसण्यासाठी संबंधित खात्यातील ज्या कर्मचा-यांना खात्यामार्फत सादर करावयाच्या अर्जाच्या नमुन्यातील माहितीची पडताळणी करून परीक्षेला बसण्यासाठी पात्र ठरविले आहे, अशा **सर्व पात्र कर्मचा-यांची यादी** सोबत जोडलेल्या नमुन्यात संबंधित खाते/विभागाच्या मध्यवर्ती कार्यालयात दि.१३.१०.२०२६ पर्यंत पाठवावी.

मध्यवर्ती कार्यालयांनी माहिती संकलित करून, उमेदवारांची परीक्षेस बसण्यासाठीची पात्रता खात्रीपूर्वक पडताळून सोबत जोडलेल्या नमुन्यात एकत्रित लेखी यादी (हार्ड कॉपी) तसेच पेनड्राइव्हवर दि.२१.१०.२०२६ पूर्वी व्यक्तीश: मराठी परीक्षा विभागास आणून द्यावी. ही माहिती Excel मध्ये असावी. आडनावाने सुरूवात करून कर्मचा-याचे संपूर्ण नाव लिहावे. श्री/श्रीम. असा उल्लेख करू नये.

सर्वसाधारण विभागातील कार्यालयांनी, त्यांच्याकडील **पात्र कर्मचा-यांची यादी** सामान्य प्रशासन विभागातील प्रशासकीय अधिकारी (भ व ब) यांच्याकडे पाठवावी. प्रशासकीय अधिकारी (भ व ब) यांनी या यादीतील उमेदवारांची पात्रता याबाबत पडताळणी करून एकत्रित यादी पेनड्राइव्हवर हार्डकॉपीसह दि.२१.१०.२०२६ पूर्वी मराठी परीक्षा विभागाकडे पाठवावी.

तसेच मुख्य लिपिक परीक्षेच्या अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने विविध अधिनियमांवर आधारित पुस्तके, कार्यालयीन परिपत्रके इ. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://hrcircular.mcgm.gov.in/hr/Circular/GAD/ChPO/Marathi Examination Section /2026 या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असून सदर बाब कर्मचा-यांना अवगत करावी.

सही/- ०२.०९.२०२६
सह प्रमुख कर्मचारी अधिकारी (आस्थापना)
तथा प्रमुख कर्मचारी अधिकारी (प्र.)

सही/- ०३.०९.२०२६
महानगरपालिका उप आयुक्त (सामान्य प्रशासन)

प्रकअ/ २६३ /सर्वसा
२०२६-२७

क्र. साप्रवि/३८८/मप
दि.०७.०९.२०२६

प्रत:----------------------------------------------------------------------------यांना माहितीकरीता व पुढील कार्यवाहीसाठी कृपया अग्रेषित.

सदर परिपत्रक बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in तसेच http://hrcircular.mcgm.gov.in/hr/Circular/GAD/ChPO/Marathi Examination Section/2026 व http://mybmcemp.mcgm.gov.in/circulars/Chief Personal Officer या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

(सही) ७/९/२६

प्रमुख कर्मचारी अधिकारी (प्र.)

## बृहन्मुंबई महानगरपालिका

मुख्य लिपिक (अर्हताधारक) संवर्गातील पदोन्नती परीक्षेस बसणा-या पात्र कर्मचा-यांची यादी

| अ. क्र. | कर्मचा-याचे संपूर्ण नाव: (आडनावाने सुरूवात करावी) श्री/श्रीम लिहू नये | विवाहित महिलांच्या बाबतीत त्यांचे विवाहापूर्वीचे नाव: | कर्मचारी संकेतांक (इंग्रजीमध्ये) | लिंग | विद्यमान पद | विद्यमान खाते | बृहन्मुंबई महानगरपालिकेतील प्रथम नियुक्तीचे पद व दिनांक | कार्यकारी सहायक व तत्सम पदावरील नियुक्तीचे पद व दिनांक | महानगरपालिका सेवेत कायम झाल्याचे पद व दिनांक | बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अखंडीत सेवेचे पद | कार्यकारी सहायक व तत्सम पदावरील एकूण अखंडीत सेवा दि.१५/०९/२०२६ पर्यंत | | | उमेदवार दिव्यांग असल्यास दिव्यांगत्वाचा प्रकार व प्रमाण % | शासन परिपत्रक क्र.दिव्यांग २०१९/ प्र.क्र.२००/दि.क.२ दि.०१.०८.२०२५ मधील निर्देशानुसार दिव्यांग कर्मचा-याने सर्व निकषांची पूर्तता केली आहे/नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | वर्ष | महिने | दिवस | | |
| १ | | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | | |

**खाते प्रमुख /सहायक आयुक्त**
**यांची सही व शिक्का**